आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.२० वाजता

२४ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- सहकार आंदोलन आणि विज्ञान यांची सांगड घातल्यास सहकाराच्या माध्यमातूनच शेतकरी आत्मनिर्भर होईल, असा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचा विश्वास

- भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट झाल्यानं ७ जणांचा मृत्यू, ५ जखमी/ शोध आणि बचावकार्य सुरु

- वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या संयुक्त संसदीय समितीची बैठक गदारोळामुळे स्थगित, विरोधी पक्षांच्या १० खासदारांचं निलंबन

**आणि**

- एसटीच्या प्रवासभाड्यात सुमारे १५ टक्के वाढ लागू, एक फेब्रुवारी पासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील होणार भाडेवाढ

**<><><><><>**

सहकाराच्या माध्यमातूनच शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग समृद्ध होऊन शेतकरी आत्मनिर्भर होईल, त्यासाठी शेतीला विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देणं आवश्यक आहे, असं केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक जिल्ह्यात मालेगाव तालुक्यातल्या अजंग इथं झालेल्या सहकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले….

**होल्ड बाईट- अमित शहा (२७ सेकंद)**

केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी राहील अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्यात साखर कारखाना उद्योगाच्या सबलीकरणासाठी केंद्र सरकार पाठबळ देत आहे, असं त्यांनी सांगितलं.

अमित शहा यांच्या हस्ते मृदा परीक्षण प्रयोगशाळेचं तसंच बेळगाव मधल्या काजू उद्योगाचं दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात आलं. या कार्यक्रमाला केंद्रीय सहकार आणि हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अनेक मंत्री उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर अमित शाह यांच्या हस्ते मुंबईत आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. सहकार चळवळीच्या विस्तारासाठी शिस्त आणि व्यावसायिकता गरजेची असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. यावेळी अमित शहा यांच्या हस्ते २०२५ या चालू आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातल्या कार्यक्रमाच्या दिनदर्शिकेचं आणि राष्ट्रीय शहरी सहकार वित्त आणि विकास महामंडळाच्या मुंबईतल्या कार्यालयाचं उद्घाटन झालं.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट होऊन ७ जणांचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. य़ा दुर्घटनेच्या वेळी कारखान्यात असलेल्या इतर कर्मचाऱ्यांचा शोध सुरु आहे. स्फोटातल्या जखमींना भंडारा रूग्णालयात दाखल केलं आहे. घटनास्थळी पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत बचावकार्य सुरु आहे. स्फोटात मृत्यू झालेल्या कामगारांच्या प्रति संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शोक व्यक्त केला आहे. या स्फोटात मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात नवी दिल्लीत होणारं संचलन पाहण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक विशेष पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यापैकी अनेक

जण दिल्लीला पहिल्यांदाच जाणार असून या सोहळ्यासाठी बोलावल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. हर घर जल योजना सक्षमपणे चालवल्याबद्दल धुळे जिल्ह्यातल्या ताजपुरी गावचे उपसरपंच तसंच ग्राम पाणीपुरवठा आणि स्वच्छता समितीचे सदस्य हेमंत सनेर यांना या सोहळ्यात निमंत्रित केलं आहे. ते म्हणाले…

**होल्ड बाईट - हेमंत सनेर (१० सेकंद)**

आयआयआयटी नागपूरच्या, अनुभव राठोड आणि मंगेश थाले या विद्यार्थ्यांनाही दिल्लीतल्या या सोहळ्यासाठी आमंत्रित केलं आहे.

**<><><><>**

भारताच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात इंडोनेशियाच्या राष्ट्रपतींचा प्रमुख पाहुणे म्हणून सहभाग हा दोन्ही देशांमधल्या मैत्रीचं प्रतीक ठरेल, असं जयशंकर आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत. प्रबोवो हे चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून ते काल नवी दिल्लीत दाखल झाले. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्लीत त्यांची भेट घेतली. प्रबोवो हे आपल्या दौऱ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर प्रबोवो यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे.

**<><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, उद्या संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. त्याच्या भाषणाचं थेट प्रसारण होणार असल्यानं, आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दररोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या, संध्याकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

राष्ट्रपतींच्या भाषणानंतर त्याचा इंग्रजी अनुवाद आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन प्रसारित केला जाईल. साडेनऊ वाजता आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन प्रादेशिक भाषांमधला अनुवाद प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकासाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत गदारोळ झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या १० खासदारांना समितीतून निलंबित करण्यात आलं आहे. तृणमूल काँग्रेस, डीएमके, काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या खासदारांचा यात समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांच्या विरुद्ध असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप भाजपानं केला. तर बैठकीचा विषय अचानक बदलल्याचा आणि दिल्ली विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून बैठकीत मूळ मुद्द्यांचा समावेश न केल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला.

**<><><><><>**

एसटी महामंडळानं प्रवासभाड्यात केलेली १४ पूर्णांक ९७ शतांश टक्के दरवाढ आज पासून लागू असून, एक फेब्रुवारी पासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार आहे. ही तीन रुपयांची असेल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. जुन्या योजना आणि सवलती कायम राहणार असून, २ हजार कोटी रुपयांची देणी, तसंच कर्मचाऱ्यांचे पगार, या आणि इतर कारणांमुळे भाडेवाढ अपरिहार्य असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत ऊर्जा सप्ताह २०२५ हा जागतिक स्तरावरचा दुसरा सर्वात मोठा ऊर्जा कार्यक्रम असेल, अशी माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिली आहे. ते आज मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. जवळपास

१ लाख चौरस मीटरपेक्षा अधिक जागेत या कार्यक्रमाचं आयोजन केलं जाईल आणि त्यात विविध सत्रांचा समावेश असेल, असंही ते यावेळी म्हणाले. 'भारताची अत्यंत यशस्वी 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजना' या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू असेल.

पुढच्या महिन्यात ११ ते १४ फेब्रुवारी दरम्यान नवी दिल्लीत या कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे.

**<><><><><>**

मतदानासाठी बायोमॅट्रीक ऑथेंटिकेशन पद्धतीमुळं मतदानातल्या गैरप्रकारांना आळा बसेल येईल, असं देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटलं आहे . ते नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्रात बोलत होते. याबरोबरच रिमोट मतदान सुविधेमुळं मतदार कुठुनही कुठेही मतदान करू शकेल, मतदार वयस्कर, अपंग अथवा परदेशात असला तरी या सुविधेचा लाभ घेऊ शकणार आहे. या परिषदेत विविध इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रणांसंबधी चर्चा झाली असून मतदार प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी याचा फायदा होणार आहे.

**<><><><><>**

मेलबर्न इथं सुरु असलेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचा अंतिम सामना उद्या होणार आहे. आर्यना सबालेन्काचा सामना अमेरिकेच्या मॅडिसन कीज सोबत होणार आहे. सलग तीन ऑस्ट्रेलियन ओपन विजेतेपद पटकावणारी १९९९ नंतर पहिली महिला बनण्याचे साबालेन्काचे लक्ष्य असेल. तर रविवारी पुरुष एकेरी विजेतेपदासाठी इटलीच्या जॅनिक सिनरची लढत जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हशी लढत होईल.

**//<><><><><>//**